
REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २९ जानेवारी १९४७ अंक ५



## सारस्वत
### को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३०–११–१९४६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,६५,०४० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,०३,००० |
| ठेवी ... | रु. ६५,७८,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७१,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम

व्याज : २ टक्के

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा —

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

## दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रुपये |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक–हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

## लग्नसमारंभास व मेजवानीसाठीं

—रुप्रॉक्सचा—

शुद्ध साखरेचा केशरयुक्त

### :: सुधारस ::

वापरा

बाटली किंमत २–८–०

घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.

मागविण्याचा पत्ता:—एम्पायर एजन्सीज, ९५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.

## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितिमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी

## विविध माहिती

**श्री. व्ही. जी. जोशी विलायतेस रवाना**—औंध म्युच्युअल विमा सोसायटी लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वि. गो. जोशी हे गेल्या शुक्रवारीं विमानमार्गें लंडनकडे रवाना झाले. बॅरिस्टरीच्या परीक्षेसाठी लिंकन इन मध्यें त्यांना प्रवेश मिळाला आहे. औंध म्युच्युअलमध्यें तेथील ऑफिस सुपरिटेंडेंट श्री. साठे हे त्यांचे गैरहजेरींत काम पहातील.

**तबकड्यांचें उत्पादन**—१९४७ सालीं अमेरिकेंत फोनोग्राफच्या २७½ कोटि तबकड्या तयार केल्या जातील.

**जोड भांडवलाची कंपनी**—हिंदी व ऑस्ट्रेलियन जोड भांडवलाची एक कंपनी मेलबर्न येथें स्थापन होत आहे. कापडाच्या गिरण्यांस लागणारी यंत्रसामुग्री तयार करून ती हिंदुस्थानाकडे पाठविणें हा तिचा उद्देश आहे. एप्रिलमध्यें उत्पादनास प्रारंभ होईल.

**मध्यवर्ती असेंब्ली**—मध्यवर्ती असेंब्लीच्या बजेटच्या अधिवेनास ता. ३ फेब्रुवारी रोजीं प्रारंभ होईल ता. १७ रोजीं रेल्वेजचें अंदाजपत्रक मांडण्यांत येईल.

**कालव्यांतील गुंतवणूक**—हिंदुस्थानांतील कालव्यांपासून सरकारास दरसाल एकूण १३ कोटि रुपये मिळतात. म्हणजे गुंतवलेल्या भांडवलावर ८% व्याज सुटतें.

**बेल्जियन कॉंगोमध्यें तागाच्या गिरण्या**—बेल्जियन कॉंगोमध्यें एक प्रकारचा ताग सांपडला असून, तागाची एक गिरणी तेथें स्थापन होत आहे. स्कॉटलंडमधून यंत्रसामुग्री आणविण्यांत येत आहे. बेल्जियन कॉंगोमध्यें तागाच्या गिरण्या सुरू झाल्यास त्यांचा हिंदी गिरण्यांवर परिणाम होईल.

**चात्यांची वाटणी**—गिरण्यांच्या चात्या व माग ह्यांच्या आयातीचे परवाने देण्यापूर्वी हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांचें मत घेऊन त्यांची वाटणी केली आहे. त्यांत बार्शी स्पि. अँड वी. मिल्सला १० हजार चात्या ( फाइन ), राजा बहादुर मोतिलाल मिल्सला ७,७०० चात्या ( फाइन ) व लोकमान्य मिल्स बार्शी ला ३,५०० चात्या ( फाइन ) मिळाल्या आहेत. महाराष्ट्रासारख्या मागासलेल्या विभागाला नवीन गिरण्या काढण्यास नसलेली संधी मिळावी या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें सहानुभूतीचें धोरण स्वीकारावें म्हणून मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स ॲण्ड इण्डस्ट्रीज पुणें यांनी हिंदुस्थान सरकारचे उद्योग व पुरवठा मंत्री यांना तारेनें निवेदन केलें आहे.

**इंपिरिअल बँक ऑफ इंडिया** — ह्या बँकेस जुलै ते डिसेंबर १९४६ ह्या सहामाहींत ५९ लक्ष, २३ हजार रु. नफा झाला. पहिल्या सहामाहीचा पुढें ओढलेला नफा मिळविला म्हणजे ९८ लक्ष, ६२ हजार रु. होतात. १४% डिव्हिडंड दिलें जाईल.

**विमा एजंटांचे लायसेन्स**—१९४५ सालीं एजंटांना एकूण १,२२,९२६ लायसेन्स देण्यांत आले, त्यांपैकीं ६६,५५३ नवे लायसेन्स होते व ५६,३७३ रिन्युअलचे होते. १९४४ सालीं देण्यांत आलेल्या लायसेन्सपैकीं ३३,५२९ रिन्यू करण्यांत आले नाहींत. १९४४ चे मानानें १९४५ सालीं एकूण ४०% ज्यास्त लायसेन्स देण्यांत आले.

**ॲक्चुअरीची परीक्षा**—इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजची प्राथमिक परीक्षा २८ व २९ जुलै रोजीं होणार आहे. उमेदवारांचे अर्ज १७ मे पूर्वी लंडनला पोंचले पाहिजेत.

**कारवार बंदर**—कारवार बंदराची सुधारणा लवकरच हातीं घेण्यांत येईल. पश्चिम किनाऱ्यावरील तें सर्वांत उत्कृष्ट नैसर्गिक बंदर आहे.

**सुवर्ण तुला**—सांगलीच्या श्रीगजानन मिलचे धनी श्री. विष्णु रामचंद्र वेलणकर ह्यांचा सुवर्णतुला समारंभ ता. १९ रोजीं पार पडला. १०५ रु. तोळा ह्या दरानें श्री. वेलणकर ह्यांच्या वजनाची किंमत ५,३७,१०४ रु. ४ आ. भरली. ह्या रकमेचा विनियोग देणग्या देण्याकडे करण्यांत आला. काटकसर, चिकाटी व दीर्घोद्योग ह्यामुळेंच आपणांस सुवर्णतुला करता आली, असें श्री. वेलणकर ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें.

**कै. प्रो. काळे ह्यांच्या चित्राचें अनावरण**—कै. प्रो. वा. गो. काळे, ह्यांच्या महाराष्ट्र बँकेंतील चित्राचें अनावरण ना. वैकुंठराव मेहता ह्यांच्या हस्तें गोखले हॉलमध्यें समारंभपूर्वक झालें. त्या प्रसंगीं प्रा. गाडगीळ, प्रा. कर्वे, श्री. आ. रा. भट, इत्यादींचीं भाषणें झालीं. श्री. मेहता ह्यांनींहि कै. प्रो. काळे ह्यांची थोरवी वर्णन केली.

**नवीन भांडवल उभारणीस परवानगी—कांहीं कंपन्या**

( १४–१–४७ ते २०–१–४७ )

| कंपनी | कंपनीचें काम | भांडवलाची रक्कम ( रु. ) |
|---|---|---|
| हिंदुस्थान शुगर मिल्स लि. मुंबई | साखर | २०,००,००० |
| जे. के. कॉटन मॅ. लि. कानपूर | सूत व कॅनव्हस | २०,१०,००० |
| इव्हॅन्स फ्रेझर अँड कं. लि. मुंबई | कापड,इत्यादींचा व्यापार | २५,००,००० |
| पेलिकन डेअरी लि. मुंबई | डेअरी | २५,००,००० |
| वेस्टर्न इंडिया मॅच कं. लि. मुंबई | आगपेट्या, इ. | ७७,००,००० |
| मुस्लिम इं.इन्स्टि. लि.मुंबई | टॅनरी, कातडें | २५,००,००० |

एकूण १८ कंपन्यांना ३,६०,८९,७८० रुपयांचें भांडवल उभारण्यास परवानगी देण्यांत आली.


# NOTICE.

NOTICE is hereby given that an Extra-Ordinary General Meeting of the Share-Holders of the Bank of Aundh Limited, will be held in the hall of Shri Yamai Temple at Aundh on Sunday the 16th February, 1947 at 10 A. M. (S. T.) to consider and adopt if thought fit the Special Resolution as circulated in detail to the Share holders of the Bank.

By Order of The Board of Directors,
B. R. VARTAK
Managing Director

AUNDH
24 January 1947.



—सुरवातीच्या—

अवघ्या ४ महिन्यांत कंपनीनें ५ लाखाचे वर काम मिळविलें.

# कॉन्टिनेन्टल म्यूच्युअल

## विमा कंपनी लिमिटेड, मुंबई

या प्रगतिमान कंपनींत आपला विमा उतरून आपलें जीवन निर्वेध करा.

ठिकठिकाणीं अत्यंत सवलतीच्या अटींवर एजन्सीज व स्पेशल एजन्सीज देणें आहेत. खालील पत्त्यावर पत्र-व्यवहार करावा.

कृ. गो. परोपकारी
मॅनेजिंग डायरेक्टर
६५, सरस्वती विलास, लक्ष्मी रोड, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २९ जानेवारी १९४७





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद् वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदी कापडाच्या गिरण्यांची नफेबाजी

अहमदाबाद येथील कापड–मजूर संघटनेचे चिटणीस श्री. खंडुभाई देसाई यांनीं हिंदी कापडाच्या गिरण्यांसंबंधीं एक अहवाल तयार केला असून त्याचा संक्षेप करून सदर अहवाल ता. १९ जानेवारी १९४७ च्या 'हरिजन' मध्यें छापण्यांत आला आहे. अहवालाचा काल १९४० ते १९४६ हा आहे. 'हरिजन' मध्यें आलेल्या संक्षिप्त अहवालाचा विचार करण्यापूर्वी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत ठेवणें जरूर आहे. एकांतिक राजकीय मतें अथवा आर्थिक कार्यक्रम यांचा पाठपुरावा करणाऱ्यावर ते समाजवादी असल्याचा आरोप नेहेमीच करण्यांत येत असतो. परंतु श्री. खंडुभाई देसाई यांच्यावर तसा आरोप करण्याचें धाडस कोणालाहि करवणार नाहीं. श्री. देसाई यांनीं आपल्या अहवालांत जी तपशीलवार माहिती दिली आहे, तीवरून एकांतिक राजकीय अगर आर्थिक कार्यक्रम सुचविणारांना अनुकूल अशीच परिस्थिति निदान कापडाच्या गिरण्यांच्या मालकांनीं उत्पन्न केली आहे असें म्हणण्यावांचून गत्यंतरच उरत नाहीं. हिंदी कापडाच्या गिरण्यांना परकीय देशाच्या स्पर्धेपासून संरक्षण द्यावें अशी मागणी गिरणी मालकांतर्फे करण्यांत येत आहे. कापड गिरण्यांना संरक्षण द्यावें कीं न द्यावें याचा विचार करण्यासाठी टॅरिफ बोर्डानें नुकतीच एक परिषद मुंबई येथें भरविली होती. तींतही गिरणी–मालक–संघटनेतर्फे सर होमी मोदी यांनीं संरक्षणाची मागणी केली आहे. पण कापड ही वस्तू सामान्य जनतेच्या रोजच्या गरजेपैकीं एक निकडीची गरज असल्यामुळें या प्रश्नाचा विचार कापूस पिकविणारा शेतकरी, कापडाचें गिऱ्हाइक व कापड तयार करणारा कामगार वर्ग यांच्या हिताच्याच दृष्टीनें होणें जरूर आहे. १९४० ते १९४६ या कालासंबंधीं श्री. देसाई यांनीं दिलेली माहिती लक्षांत घेतां केवळ कापडाच्या गिरण्यांच्या मालकांवर व सरकारी नोकरशाहीच्या मनावर कापडाचें उत्पादन व विभाजन ठेवणें अत्यंत घातक ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.

आतां श्री. देसाई यांनीं आपल्या अहवालांत एकत्रित केलेल्या माहितीचा गोषवारा देऊन परामर्ष घेण्याकडे वळूं. हिंदी कापडाच्या गिरण्यांतील एकंदर वसूल भांडवल सुमारें ५० कोटी रुपयांचें आहे. पण हें भांडवल निरनिराळ्या असंख्य भागीदारांत वाटलें गेलेलें नसून त्यापैकीं फार मोठा हिस्सा सुमारें १५० मॅनेजिंग एजंटांच्या कंपन्यांनीं आपल्या ताब्यांत ठेवलेला आहे. यावरून या धंद्यांत भांडवलाचें केंद्रीकरण किती झालेलें आहे, याची उत्तम कल्पना येईल. जनतेच्या प्राथमिक गरजांपैकी एकीवर अशा रीतीनें या १५० मॅनेजिंग एजंटांचा पूर्णपणें अधिकार चालतो. पाश्चात्य देशांत भांडवलशाही अर्थव्यवस्था अमलांत आल्यावर जो प्रकार झाला तोच हिंदुस्थानांतही होत आहे. हिंदुस्थानच्या आध्यात्मिक वातावरणांतसुद्धा भांडवलशाहीच्या विकासाचे नियम बदलूं शकत नाहींत असा निष्कर्ष कोणी काढला तर तो चुकीचा म्हणता येईल असें वाटण्याचें कारण नाहीं. युद्धपूर्व फ्रान्समध्यें ज्याप्रमाणें फक्त २०० कुटुंबांच्या हातीं फ्रान्सची आर्थिक सत्ता केंद्रीत झाली होती त्याचप्रमाणें हिंदी कापड धंद्यांतही परिस्थिति उत्पन्न झाली आहे. हिंदी कापडाच्या गिरण्यांत कायम स्वरूपाचें भांडवल म्हणजे इमारती, जमीन, यंत्रसामुग्री इत्यादींत सुमारें १०० कोटि रुपयांचें गुंतलेलें आहे. पण या भांडवलाच्या मूल्यमापनांत पहिल्या महायुद्धाच्या वेळच्या चढ्या बाजाराचे वजन आहे हे लक्षांत ठेवलें पाहिजे. कापड गिरण्यांत सुमारें २ लाख माग असून १ कोटी चात्या आहेत. दुसरें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीं दरवर्षीं ४२० कोटी वार सरासरीने कापडाचें उत्पादन होत असे. कापडाच्या गिरण्यांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या युद्धापूर्वीं ५ लाख होती ती आता ७ लाखांच्या आसपास आहे. कापडाच्या गिरण्यांतील मजुरांच्या संख्येची वाढ झाली असली तरी कापड उत्पादनांत मात्र त्या प्रमाणांत वाढ झालेली नाहीं. रात्रपाळ्या चालू असूनही कापडाच्या उत्पादनांत प्रमाणशीर वाढ झालेली नाहीं, याचें कारण उत्पादन झालेल्या कापडावर भरमसाठ नफा मिळत असल्यामुळें गिरणी मालक निष्काळजी, नालायक, व आळशी झाले आहेत, हे आहे, हा अभिप्राय कापडधंद्याविषयीं ज्यांना चांगली माहिती आहे त्यांनींच व्यक्त केलेला आहे हें विसरून चालणार नाहीं.

हिंदी कापडाच्या गिरण्यांतून युद्धापूर्वींच्या वर्षांत कापड व सूत मिळून ६० कोटी रुपयांचा माल तयार झाला. हा माल गिऱ्हाइकापर्यंत पोचेपर्यंत जी दलाली जाते ती त्यांत मिळविली तर हिंदी गिऱ्हाइकाला हा माल ७२ कोटी रुपयाला पडत असे. या सर्व व्यवहारांत सगळ्या कापडधंद्याला ५ ते ६ कोटी रुपये नफा उरत असे. युद्ध सुरू झाल्यानंतर १९४१ च्या जानेवारीपासून कापडाच्या किंमती वाढण्यास प्रारंभ झाला. त्यानंतर १९४२ च्या ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबरमध्यें त्या युद्धापूर्वींच्या कालापेक्षां ५॥ पट अधिक वाढल्या आणि १९४३ मध्यें त्या झपाट्यानें वाढत्या आणि १९४३ मध्यें युद्धपूर्वकालांत गिऱ्हाइकापर्यंत कापड पोचेपर्यंत एकंदर कापडाची किंमत ७२ कोटी रुपये होती ती ४८० कोटी झाली. पण अशा तऱ्हेनें आंकडे मांडले म्हणजे सामान्य जनतेतील व्यक्तींना चढत्या किंमतीची झळ कितपत लागली तें लक्षांत येत नाहीं. श्री. देसाई यांनीं असा वेगळा हिशेब करून असें दाखविलें आहे कीं, हिंदी गिऱ्हाइक युद्धापूर्वी दरडोई कापडासाठी दर वर्षीं १ रु. १२ आणे देत असे; त्याऐवजी १९४३ अखेर त्याला ६ रु. १२ आणे द्यावे लागत होते. यावरून कापड गिरण्यांच्या मालकांनीं व त्यांचे हस्तक बनलेल्या सरकारी नोकरांनीं जनतेची कशी पिळवणूक केली तें उघड दिसून येते. या धंद्यांतील वसूल भांडवल ५० कोटी रुपये होतें. कायम स्वरूपाचें भांडवल १०० कोटी रुपये होते. ज्यांतील वार्षिक उत्पादनाची किंमत फक्त ६० कोटी रुपये होती (युद्धापूर्वी) त्या धंद्याला युद्धाच्या सात वर्षांत दरवर्षीं सरासरी ५३ कोटी रुपयांचा एकंदर फायदा झालेला आहे. फक्त १९४३ पासून १९४५ पर्यंतच्या तीन वर्षांत देशांतील गिऱ्हाइकापासून गिरण्यांच्या यंत्र सामुग्रीची २॥ पट किंमत वसूल करण्यांत आलेली आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करून श्री. देसाई यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, न्याय, सार्वजनिक नीतिमत्ता अगर अर्थशास्त्र यापैकीं कोणत्याही दृष्टीनें कापडाच्या ४२० गिरण्यांची मालकी १५० मॅनेजिंग एजंटांच्या हातीं राहूं देणें योग्य होणार नाहीं. कापडाच्या गिरण्यांचें राष्ट्रीयकरण करावयाचें झाल्यास मालकांना कोणतीही नुकसानभरपाई देतां कामा नये असा त्यांचा अभिप्राय असून तो मनन करण्यासारखा आहे. युद्धकालाचा फायदा घेऊन गिरणी मालक, सरकारी नोकरशाही आणि कापडाचे धाडक व्यापारी यांनीं हिंदी जनतेची जी कायदेशीर नागवणूक केली तिला खरोखरच तोड सांपडणें कठीण आहे.

सारांश, श्री. देसाई यांच्या अहवालावरून पुढील सिद्धांत प्रकट होतात:

(१) हिंदी कापड गिरण्यांची खरी मालकी अवघ्या १५० मॅनेजिंग एजंटांच्या कंपन्यांच्या हातीं आहे. (२) कापडाच्या गिरण्यांचा उपयोग राष्ट्रहिताच्या दृष्टीनें करण्यांत आलेला नाहीं. (३) युद्धकालीन सरकाराशीं संधान बांधून गिरणी मालकांनीं देशांत कापडाचा दुष्काळ, काळाबाजार आणि भरमसाट किंमती यांचा सुकाळ केला आहे. कापूस पिकविणा-

त्याला व गिरणी मजुरांना अपुरें वेतन दिलेलें असून हिंदी जनतेपासून शेकडों कोटी रुपये उकळले आहेत. (४) धंदा चालविण्यांत त्यांनीं आपली नालायकी सिद्ध केलेली आहे. (५) देशांतील एका मोठ्या धंद्याचे विश्वस्त रहाण्यास आपण योग्य नाहीं हें त्यांनीं आपल्या वागणुकीनें सिद्ध केलें आहे. (६) मूळ भांडवलाच्या अनेकपट नफा गिरणी-मालकांनीं मिळविला असल्यामुळें ह्या धंदा कोणतीही नुकसानभरपाई न देतां राष्ट्राच्या मालकीचा करण्याचा राष्ट्राला पूर्ण अधिकार आहे. अशा परिस्थितींत गिरण्यांच्या धंद्यांना संरक्षण देऊन मक्तेदार भांडवलशाहीसाठीं नफ्याचें कुरण राखून ठवणें योग्य होणार नाहीं; संरक्षण द्यावयाचेंच झालें तर ह्या धंदा राष्ट्राच्या मालकीचा करण्यांत आल्यावर देतां येईल असा श्री. देसाई ह्यांचा निष्कर्ष आहे.

## स्फुट विचार

### जकाती कमी करण्यास विरोध

आंतरराष्ट्रीय व्यापारांतील अडचणींचा विचार करून, त्याची वृद्धी करण्यासाठी लंडन येथील परिषदेंत एका व्यापारी सनदेचा नुकताच विचार करण्यांत आला. या परिषदेंत मुख्यतः अमेरिकन सूचनांचाच विचार झाला. युद्धोत्तर जगाच्या व्यापारांत अमेरिकन व्यापाराला महत्त्व येणार हें उघड असल्यानें आयात निर्यातीवरील जकातीसंबंधीं अमेरिकन कारखानदारांचें धोरण समजणें इष्ट आहे. अमेरिकेंतील उद्योगधंद्यांचें अनधिकृत मत अमेरिकन टॅरिफ लीग या संस्थेतर्फे प्रगट होत असतें. या संस्थेचे अध्यक्ष मि. विक्लीफ रीड यांची साक्ष नुकतीच संस्थेतर्फे घेण्यांत आली. दोन निरनिराळ्या देशांत स्वतंत्र करार करण्यापेक्षां अनेक देशांत मिळून व्यापारी करार झाले तर जागतिक व्यापार सुरळीत चालेल ही अमेरिकन योजनेची मुख्य कल्पना आहे. त्यासाठीं अमेरिका आयातीवरील जकाती कमी करण्यास तयार होईल असें अमेरिकेच्या अध्यक्षांनीं जाहीरही केलें आहे. परंतु अमेरिकन टॅरिफ लीगचा या धोरणाला विरोध असून या धोरणामुळें अमेरिकन बाजारपेठ जगाला खुली होऊन अमेरिकेचें नुकसान होईल असा युक्तिवाद संस्थेतर्फे करण्यांत येत आहे. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या औद्योगिक राष्ट्राला अशी भीती कां वाटावी हें समजणें कठिण आहे. अमेरिकन भांडवलदारांना घरच्या बाजाराची मक्तेदारी टिकवून ; शिवाय जगभर आपले हातपाय पसरण्यास संधि पाहिजे असाच वरील धोरणाचा अर्थ होत नाहीं काय ? अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्यानें हिंदी राष्ट्रानें औद्योगीकरण होण्यापूर्वीच आयातीवरील जकाती कमी कराव्या असा आग्रह धरला होता. या मागणीलाही मि. रीड यांनीं विरोध केला असून औद्योगीकरण होईपर्यंत हिंदुस्थानानें आयातीवरील जकाती कमी न करण्याचें धोरण स्वीकारणें इष्ट होईल असें मत प्रगट केलें आहे. अमेरिकन आयात जकातीसंबंधीं त्यांनीं केलेलें मत प्रदर्शन हिंदी जकातीसंबंधींच्या त्यांच्या मताशी सुसंगत आहे.

---

### अमेरिकन अर्थव्यवस्थेचें भवितव्य

हिंदी अर्थव्यवस्थेचे संबंध अमेरिकन अर्थव्यवस्थेशी यापुढील काळांत अधिक निकटचे होत जाणार आहेत. अर्थातच अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या भरती–ओहोटीसंबंधीं हिंदी जनतेनें माहिती मिळविणें जरूर आहे. अमेरिकन अर्थव्यवस्थेसंबंधीं सध्या अमेरिकेंत खूपच चर्चा चाललेली आहे. कांहीं अर्थशास्त्रज्ञांचे मतानें अमेरिकन अर्थव्यवस्थेवर १९२९ सालाप्रमाणेंच मोठें गंडांतर कोसळल्याखेरीज रहाणार नाहीं. उलट, कांहीं तज्ज्ञांच्या मतानें १९४७ सालांत तरी अमेरिकन अर्थव्यवस्था मंदीच्या लाटेंत सांपडणार नाहीं. या दोन मतांना पाठिंबा देणारे गट मजूर–संघटना व मालकांची संघटना हे आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अमेरिकेंतील सगळ्यांत सामर्थ्यसंपन्न मजूर–संघटना सी. आय. ओ. या नांवाची असून अमेरिकन अर्थव्यवस्थेसंबंधीं त्या संस्थेतर्फे एक अहवाल तयार करण्यांत आलेला आहे. हा अहवाल एका माजी सरकारी अर्थशास्त्रज्ञानें तयार केलेला असून अमेरिकन उद्योगधंद्यांना मजुरांच्या वेतनांत २५ टक्के वाढ पदार्थांच्या किंमती न वाढवितां करतां येईल असें त्यांत म्हटलें आहे. मजुरांच्या वेतनांत वाढ झाल्यानें वस्तूंच्या किंमती वाढतील आणि मजुरांची वेतनाची वाढ करण्याची मागणी पुन्हां येईल;या आपत्तींतून कधींच सुटका व्हावयाची नाहीं; आणि त्यामुळेंच मंदी येईल अशी उपपत्ती कांहीं अर्थशास्त्रज्ञ लावीत आहेत. धंदेवाल्यांच्या संघटनेनें (नॅशनल असोसिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्स) सी. आय. ओ. चें आंकडेशास्त्र मूर्खपणाचें आहे असा अभिप्राय व्यक्त केला आहे. अमेरिकेंतील फारच थोड्या उद्योगधंद्यांना मजुरींत १० टक्क्यांपेक्षां अधिक वाढ करतां येईल असें या संघटनेचें मत आहे. तूर्त चर्चेच्या स्वरूपांत असलेला हा संघर्ष अखेर तज्ज्ञांच्या मतानें न सुटतां, मजूर–संघटना व मालकांची संघटना यांच्यांतील परस्पर बलानेंच ठरणार आहे. अमेरिकन कोळसा–कामगारांचा संप मार्चपर्यंत स्थगित झालेला असून पोलादाच्या कारखान्यांतूनही संपाचें वातावरण पसरलेलें आहे. प्रे. ट्रुमन यांच्या सरकारला ह्या आर्थिक संघर्षाला लवकरच तोंड द्यावें लागणार असें दिसतें.

---

### ब्रिटिश बँकांची निष्कारण सजावट बंद झाली

लंडन क्लिअरिंग बँकांनीं ठराविक दिवशींच आपले हिशेबाचे तक्ते तयार करावेत, असें त्या बँकांच्या कमिटीनें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें, बँकांच्या रोजच्या शिलकेचें ठेवींशीं प्रमाण ८% असावें, असेंहि ठरविण्यांत आलें आहे. ब्रिटिश बँकांची, आपले ठराविक वेळीं तयार करावयाचे हिशेब सजवून मांडण्याची पद्धति फार जुनी आहे, ती ह्या नव्या निर्णयामुळें आतां बंद पडणार आहे. वास्तविक, रोजच्या रोखीचें ठेवींशीं सरें प्रमाण ७½% असतांनाहि, बँका सजावटीच्या दिवशीं तें १०% वर आणून ठेवीत असत आणि त्यासाठीं आपलीं कर्जें परत मागवून रोखीची रकम फुगवून दाखवीत असत. १५ वर्षांपूर्वींच सुप्रसिद्ध मॅकमिलन कमिटीनें ह्या सजवटीच्या पद्धतीवर कडक टीका केली होती. " ह्या पद्धतीपासून फायदा कांहीं होत नाहीं व ती ब्रिटिश बँकिंग पद्धतीच्या लौकिकास साजेशी नाहीं " असा मॅकमिलन कमिटीनें अभिप्राय व्यक्त केला होता. बँकांची परिस्थिति भडकपणें सांगणाऱ्या सजावटीच्या पद्धतीमुळें पैशाच्या बाजारांत निष्कारण चढ उतार मात्र होत असे. रोखीचें ठेवींशीं १०% इतकें प्रमाण नेहमीं असावें, ही कल्पना आतां जुनी पुराणी झाली आहे आणि त्यापेक्षां कमी प्रमाण राखून व्यवहार करणें ब्रिटिश बँकांस धोक्याचें राहिलेलें नाहीं.

---

### रशियन चष्म्यांतून चिनी–अमेरिकन तह

गेल्या नोव्हेंबरमध्यें चीन व अमेरिकन संयुक्त संस्थानें यांच्यांत जो तह झाला त्यावर 'मायकेल मारकोव्ह' नामक रशियन भाष्यकारानें कम्युनिस्ट पक्षाचें मुखपत्र ' प्रवदा ' यामध्यें सडकून टीका केली आहे. मारकोव्हच्या लेखाचें नांव ' असमान तह ' असें आहे. नानकिंगमध्यें झालेल्या या नव्या तहानें यापूर्वी १९४३ सालांत चीन-अमेरिकेंत प्रादेशिक जादा हक्क रद्द करण्याचा जो तह झाला होता तो जरी फिरवला जात नाहीं आणि गेल्या महायुद्धांत समान शत्रूशीं लढलेल्या दोन राष्ट्रांत जरी हा तह होत आहे तरी त्याचा व्यावहारिक परिणाम चीन हा अमेरिकेचा मांडलीक होण्यांतच होणार आहे. लष्करी मदतीच्या मोबदल्यांत चिनी सरकारनें अमेरिकेला पुष्कळ जादा सवलती देण्याची हमी घेतली आहे. त्यामुळें चीनवर अमेरिकेचें आधिराज्य स्थापलें जाईल. गेल्या सात महिन्यांत चीननें अमेरिकेपासून इतकी युद्धसामुग्री खरेदी केली आहे कीं, युद्धकालीन आठ महिन्यांत सुद्धां तितकी चीननें पूर्वी खरेदी केलेली नाहीं. यामुळें चीनचा खजिना रिता झाला असून अमेरिका ही चीनचा मोठा धनको बनली आहे. अशा रीतीनें अमेरिकेने उघड उघड व बिनदिक्कतपणें चीनच्या सार्वभौमत्वाची पायमल्ली केली आहे असें मारकोव्हचें म्हणणें असून त्यास माओ टुन या चिनी लेखकाचा दुजोरा आहे. अमेरिकन मक्तेदारांस चीनचे महत्त्वाचे हितसंबंध बळी दिल्याचा हा तह हा एक महत्त्वाचा दाखला आहे.

# हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचें नियोजन

## सरय्या समितीच्या सूचना

लेखकः—रावसाहेब य. कृ. खोले, एल. एस. जी. डी.

हिंदुस्थान सरकारनें सन १९४५ सालीं मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या यांचे अध्यक्षतेखाली एक समिति नेमून तिजकडे हिंदुस्थानांत सहकारी चळवळीचें नियोजन करण्यासंबंधींचा प्रश्न सोंपविला होता. या समितीचे बारा समासद होते व त्यांनीं आपला अहवाल सरकारास सादर केला असून तो प्रसिद्धीसाठीं सरकारनें नुकताच दिला आहे.

### सहकारी संस्थेचें नियोजनामध्यें स्थान

समितीच्या मतें लोकशाही आर्थिक नियोजनामध्यें सहकारी संस्थांचा फार मोठा भाग आहे. समितीनें सहकारी चळवळीच्या अंगोपांगाचा विचार करून पुढील विस्ताराची योजना तयार केली असून त्यासाठीं सरकारला सुमारें ५० कोट रुपये खर्च येईल असें सुचविलें आहे. वर सुचविलेली रक्कम सहकारी चळवळ ही सर्व आर्थिक चळवळीशीं निगडित असल्यानें ज्यास्त म्हणतां येत नाहीं. कारण या नियोजनामुळें व त्यावर होणारा खर्च अप्रत्यक्ष दृष्टीनें राष्ट्रीय आर्थिक जीवनाशीं निगडित असाच राहील. सहकारी चळवळीच्या भवितव्यासंबंधीं विचार करतां, सध्यांच्या संस्था व त्यांच्या कार्यांचा विस्तार लक्षांत घेतां त्यांचा उपयोग समाजघटनेमध्यें योग्य तो फेरफार करून घेणें अवश्य आहे. सहकारी चळवळींमधील संघशक्ती व संघाचें संघटन हे व्यक्तिगत संस्थेपेक्षां बलवान असल्यानें कार्याचें एकीकरण करून विधायक कार्य करणें सुकर होतें. सहकारी चळवळ यशस्वी होण्यास समितीच्या मतें पुढील गोष्टी फार महत्त्वाच्या आहेतः—

### समितीच्या शिफारशी

( १ ) लोकशाही असें जबाबदार सरकार ( २ ) सरकारनें शेती मालाच्या निश्चित किंमती ठरविणें ( ३ ) व राष्ट्रामध्यें शिक्षणाचा फैलाव करणें

समितीच्या मतें सहकारी संस्थेचें समासदत्व हें केवळ ऐच्छिक असावें असें आहे, तथापि कांहीं सहकारी संस्थांचे बाबत समासदत्व सक्तीचें असणें जरूर असल्याचें नमूद केलें आहे व जर असें केलें नाहीं तर आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें केलेल्या नियोजनाचा उपयोग होत नाहीं व अशा बाबत सोसायटीच्या ३/४ समासदांनी केलेला ठराव हा इतर बिगर समासदांचेवर बंधनकारक असावा.

समितीने केलेल्या शिफारशीं पैकी महत्त्वाच्या अशा पुढील शिफारशी आहेत.

( १ ) सहकारी नियोजनास सरकारनें मार्गदर्शन व सल्ला द्यावा व लोकांचे मध्यें सहकारी चळवळीच्या वाढीच्या दृष्टीनें उपयुक्त असें धोरण कोणतें यासंबंधी जागृति करावी.

( २ ) सल्लामसलत देण्यासाठीं अशा प्रकारची व्यवस्था असावी कीं जेणें करून परस्पर विचारविनिमय सरकारी व बिनसरकारी अधिकारी यांजमध्यें होऊं शकेल.

( ३ ) प्रांतिक सरकारनें योग्य ती पहाणी करून सध्यांचे पडित जमीनपैकीं किती जमीन शेतीसाठीं उपयोगांत आणता येईल याचा विचार करावा.

( ४ ) कालव्याच्या पाण्याची सोय करण्याचे कामाची प्रायः जबाबदारी ही सरकारची आहे. कारण त्यासाठीं लागणारी रक्कम सरकारच खर्च करूं शकेल

( ५ ) प्राथमिक सहकारी संस्था यांचा विस्तार असा व्हावा कीं, जेणेंकरून शेतकरी जीवनाचे सर्व प्रश्न संस्थेस सोडविता येतील. या संस्थेची अशी सुधारणा करावी कीं जेणेंकरून ही संस्था समासदांची आर्थिक उन्नति करण्याचें केंद्र होईल.

( ६ ) सहकारी कार्यक्षेत्रांत निदान ५० टक्के खेडेगांव व ३० टक्के खेडगांवची लोकसंख्या यांचा समावेश होऊं शकेल व हें कार्य १० वर्षांचे कालावधींत दोन पंचवार्षिक कार्यक्रमानें व्हावें.

### सहकारी शेती

( ७ ) मोठ्या प्रमाणावर शेती करण्यास सहकारी शेती हाच उत्तम मार्ग आहे आणि यामुळें मालकी हक्कासंबंधीं वाद उत्पन्न होण्याचें कारण नसल्यानें या योजनेस यशस्वी होण्याची शक्यता आहे. म्हणून सहकारी शेतीचा प्रचार सर्व प्रांतांत व्हावा.

( ८ ) फळें व भाज्यापाले यांची वाढ मोठ्या प्रमाणावर व्हावी.

( ९ ) जंगलाचें संरक्षण व त्याचें जतन व व्यवस्था हीं कामें सरकारनेंच करावीं.

( १० ) गुरांचे दवाखाने या खात्यानें आपल्या पाहणीचा असा विस्तार केला पाहिजे कीं जेणेंकरून त्याचा उपयोग प्रत्येक जनावरांचे मालकास झाला पाहिजे.

( ११ ) दुग्ध उत्पन्नाच्या सोसायट्या शहरांचे ३० मैलांचे आंत स्थापन व्हाव्यात व शहरांना परिणामकारक दुग्ध पुरवठा व्हावा या दृष्टीनें ३०० दुग्ध पुरवठाकेंद्रें स्थापन व्हावींत व त्यासाठीं लागणारें भांडवल सरकारनें द्यावें व चालू खर्चापैकीं ५० टक्के खर्च सरकारनें सोसावा.

( १२ ) प्रत्येक प्रांतिक सरकारनें आपल्या खर्चानें योग्य अशा ठिकाणीं एक आदर्श असें पोल्ट्री फार्म ठेवावें.

( १३ ) १० वर्षांत सुमारें २५ टक्के शेतकऱ्यांच्या विक्रीस योग्य असा माल सहकारी चळवळीचे मार्फत विकला जावा असे प्रयत्न करावे.

( १४ ) एक अखिल भारतीय सहकारी मार्केटिंग असोसिएशन काढावी व त्या संस्थेने प्रांतिक संस्थांशी निगडित संबंध आणून परदेशांशीं व्यापारी संबंध ठेवावेत व शेतकी मालाच्या उठावासंबंधीं प्रयत्न करावेत.

( १५ ) सहकारी चळवळीचा प्रचार व विस्तार झाल्यास खेडेगांवांतील पतीस त्याचा चांगला उपयोग होईल.

( १६ ) प्रादेशिक अशा संस्था स्थापून त्यांजकडे खेडेगांवातील उद्योगधंदे व लहान प्रमाणांतील औद्योगिक धंदे यांच्या वाढीचें व जोपासनेचें काम द्यावें व अशा संस्था प्रांतांत व संस्थानांत स्थापन व्हाव्यात.

( १७ ) नागरी बँका सर्व शहरांमध्यें स्थापन व्हाव्यात.

( १८ ) प्रांतांतील सहकारी खात्यानें एक तरी स्त्री विशिष्ट अधिकारी नेमून तिने स्त्रियांनीं सहकारी चळवळींत भाग घेण्यासंबंधी प्रचार करावा व स्त्रियांनीं चालविलेल्या सहकारी संस्थांवर देखरेख करावी.

( १९ ) हिंदुस्थान सरकारनें एक संस्था स्थापून त्यामध्यें सहकारी उच्च शिक्षणाची व्यवस्था व संशोधकांची व्यवस्था करावी. यामुळें शिक्षणाची सोय होऊन संशोधनकार्यास चालना मिळेल.

( २० ) सहकारी चळवळीची अपुरी व अनियमित प्रगति होण्यास मुख्यतः कारण म्हणजे ज्यांच्यासाठी ही चळवळ अस्तित्वांत आली त्यांचेमध्यें सर्वसाधारण शिक्षणाचा अभाव हें होय. सहकारी चळवळीची खरी यशस्विता सर्व साधारण शिक्षणाचा प्रसार करून समासदांमध्यें सहकारी चळवळीच्या तत्वाचा प्रसार करून त्यासंबंधीं त्यांना योग्य तीं शिकवणूक देऊनच होईल असें समितीनें नमूद केलें आहे.

---

## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

ब्रिटिश कंपनी कायद्यांत दुरुस्ती करणारें एक मोठें बिल सध्यां पार्लमेंटांत चर्चिलें जात आहे. ताळेबंदांतील आकड्यांबरोबर पूर्वीच्या वर्षांचे तुलनात्मक आकडे देणें त्या बिलानें आवश्यक ठरविलें आहे. कोणत्याहि डायरेक्टराचें वय त्याच्या नेमणुकीचे वेळीं ७० चे वर असतां कामा नये. ७० वें वर्ष लागतांच डायरेक्टरानें आपली जागा त्यानंतरच्या वार्षिक सभेचे वेळीं खाली केली पाहिजे. स्पेशल ठराव करून एखाद्या डायरेक्टराची नेमणूक केली आणि त्याचें वय त्या सभेंत जाहीर केलें, तर ७० वर्षांची अट त्यास लागू पडणार नाहीं. त्याचप्रमाणें, खासगी लिमिटेड कंपन्यांचे डायरेक्टर कितीही म्हातारे असूं शकतील. खासगी कंपन्यांना आतापर्यंत आपले वार्षिक हिशोबाचे तक्ते फाइल करावे लागत नसत, ते ह्यापुढें करावे लागणार आहेत. परंतु, त्या नियमास कांहीं अपवाद ठेवलेले आहेत. कित्येक खासगी ( प्रायव्हेट ) कंपन्या वास्तविक खासगी स्वरूपाच्या नसतात; त्यांच्या व्यवहारांत सरोखरच सार्वजनिक हित गुंतलेलें असतें; आणि अशा कंपन्यांच्या व्यवहारास प्रसिद्धि मिळणें आवश्यकच ठरतें.

## आधुनिक जीवनांत जाहिरातीचें महत्त्व

### पॅरेमाउंट पब्लिसिटी सिंडिकेटचें उद्घाटन

पर्सनल प्रेस सर्व्हिसचा ९ वा वाढदिवस व पॅरेमाउंट पब्लिसिटी सिंडिकेटचें उद्घाटन ह्यांचा समारंभ श्री. न. चिं. केळकर ह्यांचे अध्यक्षतेखालीं नुकताच झाला. त्या वेळीं सिंडिकेटचे चेअरमन, श्री. धोंडूमामा साठे, ह्यांनीं आपल्या भाषणांत जाहिरात शास्त्रासंबंधीं कांहीं उद्बोधक माहिती सांगितली. ते म्हणाले:—

### श्री. धों. कृ. साठे ह्यांचें भाषण

अमेरिका आणि इंग्लंड वगैरे पाश्चात्य देशांत जाहिरातीचें शास्त्र पुष्कळच पुढें गेलें आहे. भांडवलशाही चढाओढीच्या औद्योगिक जीवनांत जे कारखाने जाहिरातीच्या नव्या नव्या कल्पना व योजना अंमलांत आणतात त्यांना बाजारपेठेंत जोराचा उठाव मिळतो असा अनुभव आहे. जाहिरातीमुळें मालाचा खप कसा आश्चर्यकारक होतो याचें अमेरिकेंतलें एक ताजें उदाहरण मीं आपणांस देतों. अलीकडे बाजारांत अमेरिकेची बॉल पॉइंट असलेली फौंटनपेन्स् आपण पाहिलींच असतील. बिरो या अमेरिकन कंपनीनें अशा तऱ्हेचें उत्पादन प्रथम सुरू केलें, त्यानंतर आणखीही कांहीं फौंटनपेन कंपन्यांनीं त्या धर्तीवर पेन्स काढण्यास सुरवात केली. ह्या सर्व कंपन्यांनीं आपल्या मालाच्या प्रसिद्धीसाठीं नवें जाहिरात तंत्र अंमलांत आणलें. गेल्या वर्षांत या तऱ्हेच्या फौंटनपेन्सचा खप लाखों डॉलरचा झाला असून, जुन्या पद्धतीच्या फौंटनपेन कारखानदारांनीं तोंडांत बोटेंच घातलीं आहेत.

आज अमेरिका आपल्या राष्ट्राच्या उत्पन्नापैकीं ३ टक्के रक्कम जाहिरातीसाठीं खर्च करीत आहे. इंग्लंडचे या खर्चावरील जे ताजे आकडे हातीं आले आहेत त्यावरून असें दिसतें कीं, तेथें सालीना ९ कोट पौंड जाहिरातीवर खर्ची पडतात. आतां युद्धोत्तर काळांत व्यापारी चढाओढ विशेष तीव्र होणार आहे. यावेळीं कारखानदारांना अधिक जागरूक राहून आपल्या मालाच्या जाहिरातीवर अधिकाधिक खर्च करावा लागणार आहे.


या परिस्थितीकडे लक्ष देऊन आपल्या परिचयाच्या पर्सनल प्रेस सर्व्हिसचे चालक श्री. ना. तु. ठाकूर यांनीं सदर संस्था करीत असलेल्या जाहिरात एजन्सीच्या कामाची व्यापक प्रमाणावर पुनर्घटना करण्याचें ठरवून प्रस्तुत पॅरेमाउण्ट पब्लिसिटी सिंडिकेट लिमिटेडची उभारणी केली. जाहिरात क्षेत्रांत समाईक भांडवलावर चालविलेल्या कंपन्या फारच थोड्या आहेत. पुण्यांत हें काम करणारी प्रस्तुतची पहिलीच लिमिटेड कंपनी असून त्यामुळें तिला कार्यक्षेत्र मोठेंच व्यापक मिळालें आहे.

### दि रत्नाकर इंडस्ट्रीज लि., कोल्हापूर

( वार्षिक सभा: ३०–१–१९४७ )


वरील कंपनीच्या स्थापनेपासून ( ३० एप्रिल १९४५ ) ३१ डिसेंबर १९४६ अखेरच्या पहिल्या वृत्तांतावरून तिच्या प्रगतीची कल्पना येते. कंपनीचें ६ लक्ष, ६३ हजार रुपयांचे शेअर्स खपले असून ४ लक्ष, ५७ हजार रुपये वसूल झालेले आहेत. श्री. अण्णासाहेब लठ्ठे हे कंपनीचे चेअरमन आहेत. श्री. पी. बी. सुलताने ह्यांचिकडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

पुष्कळ अडचणींतून खटपट करून कंपनीस रोज १० टन वनस्पतिजन्य तूप व ५ टन रिफायनरीच्या मशिनरीचें इंपोर्ट लायसेन्स मिळालें आहे. त्यानंतर कंपनीनें इंग्लंडमधील सुप्रसिद्ध कारखानदार मेसर्स पॉवर गॅस कार्पोरेशन लिमिटेड यांचेकडे मशिनरीची ऑर्डर दिली आहे व त्यापैकीं थोडी मशिनरी गेल्या महिन्यांत मुंबई येथें आली असून लवकरच ती कोल्हापुरांत येईल. गेल्या वर्षी कंपनीनें भुसावळ येथें एक ऑईल मिल रु. १,५०,००० ( एक लाख पन्नास हजार ) रास खरेदी केली होती. गिरणीची मशिनरी व तेथील इमारतींचें कांहीं सामान कोल्हापुरास आणलें आहे. कंपनीनें गेल्या वर्षी दरबारकडून अंदाजें २३ एकर जागा, दरबारनें कारखान्यासाठीं राखलेल्या विभागांत खरेदी केली असून, त्या जागेवर कंपनीच्या इमारती पुऱ्या होत आल्या आहेत. तसेंच त्या जागेवर कांहीं शेड्स् बांधल्या आहेत. वरील सर्व बिल्डिंग्ज व शेड्स करितां कंपनीस अंदाजें रुपये ७५,००० ( पंच्याहत्तर हजार ) खर्च आला आहे. भुसावळ येथील खरेदी केलेली ऑईल मिल कोल्हापूर येथें आणून ही सर्व फिटींग करण्यांत आलेली आहे. लवकरच गिरणीचें काम सुरू होईल. कंपनीजवळ तूत ३ एक्सपेलर्स असलेनें त्यावरील उत्पादनास फेब्रुवारी महिन्याच्या अखेरपर्यंत सुरवात होईल. व्हिजिटेबल घी प्लँटची संपूर्ण मशिनरी बहुतेक चालू वर्षाच्या (१९४७) मध्यापर्यंत येईल असा अंदाज आहे. कंपनीचा सर्व कारखाना चालू वर्षअखेरपर्यंत सुरू होईल.















# मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याज–वजा

+शिंदिया स्टीम रु. १–४–० दि. २०–१–४७

+असो. सीमेंट रु. ७ दि. २३–१–४७

व्याज–वजा

सिंप्लेक्स रु. ४ दि. २८–१–४७

साप्ताहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २१।१।४७ | बुधवार २२।१।४७ | गुरुवार २३।१।४७ | शुक्रवार २४।१।४७ | सोमवार २७।१।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४१७-८; २५२७–८ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २६५५ | २६७६—४ | | २६६७—८ | २७११—४ |
| ६३८; ४५७–८ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४८१ | ४८४ | | ४८२—८ | ४९१ |
| ६५; ३६–४ | ०–८–०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | ३५–१२ | ३६ | | ३७ | ३७–१० |
| ७१-४; ४४–१० | ०–१४–०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ४३–१२ | ४४—४ | | ४४–१४ | ४५–१३ |
| ३२७७-८; २१३२–८ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २८३५ | २८५० | | २८३७—८ | २८६० |
| ११८०; ६५८ | १२–०–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ८६५ | ८७४ | | ८७५—० | ८८८ |
| ९९९; ६६० | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ८०९ | ८११ | | ८३५ | ८४८ |
| ५६७; ३९८ | ७–०–०S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४०१ | ४०५ | | ४०६ | ४०६ |
| ५५२; ३१४ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३९८ | ४०३ | बाजार बंद | ४०१ | ४०५ |
| ५७१; ३२३ | ६–०–०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३५६ | ३६३—८ | | ३६१ | ३६४—० |
| ५९४; ३२५-८ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४०८ | ४१०—८ | | ४१२ | ४३२ |
| ७-४-६; ४-८-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५०—६ | ५—१—० | | ५—०—६ | ५—१ |
| २९-१; १६-१२ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १८–१५ | १९—५ | | १९—१ | १९—५ |
| ६-११-६; ३-३-६ | ०–३–० | म | ,, डिफर्ड्स | १ | ४—३ | ४—३ | | ४—२ | ४—३ |
| १०९२–८; ७३५ | ४१–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८११—४ | ८१५ | | ८१२—८ | ८१५ |
| २७८; २२५ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २२६ | २२३—८ | | २१५–८+ | २१६—८ |
| ३७५; २४० | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३१८ | ३१९ | | ३२० | ३२० |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६३७—८ | ६३३–१२ | | ६२६—४ | ६४० |
| ६०-१० ३६-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३९–४+ | | | ४०—२ | ४० |

## मतपत्र आणि धंदेवाईक वृत्तपत्रें

आधुनिक लोकव्यवहारांत मतपत्र व वृत्तपत्र या दोन्ही दृष्टीनें वृत्तपत्रांना अत्यंत मानाचें व महत्त्वाचें स्थान आहे. वास्तविक वृत्तपत्र व मतपत्र हीं दोन अंगें वेगवेगळीं असून त्यांचा एकमेकाशीं निकटचा संबंध असण्याचें कारण नाहीं. परंतु वृत्तपत्राच्या व्यवसायाचेंहि एक अर्थशास्त्र आहे. वृत्त व मत या दोहोंत सरोसर नसणारा संबंध या दुव्यानें उत्पन्न होतो यांत कांहीं शंका नाहीं. यासंबंधाचें एक उद्बोधक उदाहरण म्हणून अमेरिकेंतील 'पीएम' या वृत्तपत्राची हकीगत देण्यासारखी आहे १९४० सालीं सुप्रसिद्ध अमेरिकन पत्रकार मि. राल्फ इंगरसॉल यांनीं हें पत्र सुरू केलें. सदर पत्र सुरू करण्यांत त्यांचा मुख्य हेतु असा होता कीं जाहिराती न घेतां आपल्याला योग्य वाटेल तें मतप्रदर्शन करण्याची मोकळीक रहावी. अमेरिकेंतील व इतरही जगांतील वृत्तपत्रांचे जीवन बऱ्याच अंशानें जाहिरातींच्या उत्पन्नावर अवलंबून असतें हें प्रसिद्ध आहे. या पद्धतीनें चालणाऱ्या वृत्तपत्रांच्या मतप्रदर्शनावर पुष्कळदा अन्याय्य दडपणही येतें; निदान अमेरिकेंत तरी असा अनुभव बऱ्याच पत्रपंडितांना आलेला आहे. तेव्हां ही आपत्ती टाळण्यासाठीं मि. इंगरसॉल यांनीं मार्शल फील्ड नांवाच्या एका बड्या धंदेवाल्याच्या मदतीनें वरील वृत्तपत्र काढलें. पण लवकरच या वृत्तपत्राची आर्थिक परिस्थिति खालावली. या वृत्तपत्रानें अमेरिकेच्या घरच्या व परदेशीय धोरणाबद्दल बरीच पुरोगामी भूमिका घेतलेली होती; आणि त्याचा खपही १॥ लाख प्रतींच्यावर होता. परंतु त्याचा फारसा उपयोग न होतां मि. इंगरसॉल यांना अखेर आपलें पत्र आतां मि. फील्ड यांच्या हवालीं करावें लागलें असून स्वतः संपादकत्वही सोडावें लागलें आहे. या वृत्तपत्राला आर्थिक पाठिंबा देणाऱ्या इतर धनिकांनाही या आतबट्ट्यांच्या व्यवहाराचा कंटाळा आला. वृत्तपत्रानें आपलें अस्तित्व आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी केलें पाहिजे असें ठरवून वृत्तपत्रांत जाहिराती घेण्यास प्रारंभ झाला; आणि त्याच बरोबर त्यांच्या निर्भीड मतप्रदर्शनांतही फरक पडूं लागला. अमेरिकेंतील वृत्तपत्रीय स्वातंत्र्य काय प्रकारचें आहे याची या हकीकतीवरून चांगली कल्पना येते. पॅरिसच्या तहपरिषदेंत अमेरिकन परराष्ट्रमंत्री (आतां निवृत्त) मि. बर्न्स यांनीं रशियन वृत्तपत्रीय स्वातंत्र्याविषयीं शंका प्रदर्शित केली होती. त्यावेळीं एम. मोलोटाव्ह यांनी जें उत्तर दिलें होतें त्याचें प्रत्यंतर आणखी एकदां नव्यानें आलें इतकेंच. मतपत्र आणि धंदेवाईक वृत्तपत्रें यांच्यांतील हा विरोध सध्याच्या अर्थव्यवहारांत अपरिहार्य असाच आहे.

**श्री. एम. व्ही. गोखले**—दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे, डायरेक्टर श्री. एम व्ही. गोखले हे निवृत्त झाले असल्याचें समजतें.

**प्रेसिडेन्सी इं. बँक लि.**—वरील बँक शेड्यूल्ड बँक होण्याच्या मार्गावर असून त्या दृष्टीनें तिची पहाणी रिझर्व्ह बँकेनें नुकतीच केली.

**ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्ट**—ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट १ फेब्रुवारी, १९४७ पासून सबंद मुंबई प्रांतास लागू करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

**धूम्रपानावर कर**—धूम्रपानावर कर बसविण्याचा मद्रास सरकारचा विचार आहे.

**शेतीविषयक मासिकें**—हिंदी आणि उर्दूमध्यें शेतीची माहिती देणारीं स्वतंत्र मासिकें इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रि. रिसर्च सुरू करणार आहे.

**वाटाघाटीस प्रारंभ**—ब्रिटिश सरकार व हिंदुस्थान सरकार ह्यांचेमध्यें, ग्रेट ब्रिटनमधील हिंदी येण्याच्या बद्दलीबाबत लवकरच वाटाघाटी सुरू होणार आहेत.

**इन्स्टिट्यूटचे ऑनररी सेक्रेटरी**—प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या ऑनररी सेक्रेटरीचें काम करण्यास श्री. व्ही. पी. वर्दे (प्रो. सहकारी बँकेचे ऑनररी मॅ. डायरेक्टर) ह्यांनीं संमति दिली आहे.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

श्री श्री श्री श्री श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण

वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री



लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

# दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

—यांचे—

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

'मधुकर' ( सात फण्यांचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.